# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये विद्यार्थी करिअर संसद स्थापन

पाटण, दि. ९ : महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राच्यावतीने आयोजित करियर कट्टा अंतर्गत पाटण येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये विद्यार्थी करियर संसदेची स्थापना करण्यात आली.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण करिअर कट्ट्याअंतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांना स्वत:चे करिअर घडविताना स्वयंशिस्तीचे, व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे धडे मिळावेत यासाठी संपूर्ण राज्यातील महाविद्यालयात करिअर कट्ट्याअंतर्गत करियअर संसदेची रचना करण्यात येत आहे. त्यानुसार बाळासाहेब देसाई कॉलेजमधील विद्यार्थ्यांची करिअर कट्ट्याअंतर्गत विद्यार्थी करिअर संसदेची रचना करण्यात आली असून संसदेत मुख्यमंत्री म्हणून जॉन जॉन्सन कुट्टो, नियोजन मंत्री अदिती अमर परीट, कायदे व शिस्तपालन मंत्री संगीता सुपुगडे, सामान्य प्रशासन मंत्री संगीता मोळावडे, माहिती व प्रसारण मंत्री अलमास मुल्ला, उद्योजकता विकास मंत्री शुभम गायकवाड, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री नजनीज मुल्ला, कौशल्य विकास मंत्री विनायक - भिसे, संसदीय कामकाज मंत्री सिद्धी उदुगडे, तसेच उपमंत्री म्हणून जना मकामले या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.



शुभारंभप्रसंगी डॉ. एस. डी. पवार व इतर.

बाळासाहेब देसाई कॉलेज व करिअर कट्टा अंतर्गत बरेच विद्यार्थी पोलीस भरती व सैन्य दलात भरती झाले आहेत. करिअर कट्टाच्या विविध उपक्रमात सहभागी होत असतात. या संसदेच्या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, करियर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ. संदीप तडाखे, समन्वयक प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. जी. एस. चव्हाण यांनी पुढाकार घेतला तर संसद स्थापनाप्रसंगी वार, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एच. व्ही. काटे, यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.